35

# दारिद्रय रेषेखालील व्यक्ती व शासनाच्या उपाययोजना

गजानन संभाजीराव देशमाने
(अर्थशास्त्र विभाग)
कै.डॉ.शंकरराव सातव कला व वाणिज्य
महाविद्यालय ,कळमनुरी

**प्रस्तावना :-**

अल्पविकसित देशात मोठया प्रमाणात दारिद्रय आढळुन येते दारिद्रय ही एक अशा सामाजीक समस्या आहे,ज्यामध्ये समाजाचा एक मोठा गट जीवनाच्या मुलभूत गरजांपासुन वंचित राहतो अर्थ व्यवस्थेतील एक गंभीर समस्या म्हणून दारिद्रयाकडे पाहण्यात येते दारिद्रयाच्या अवस्थेत अन्न,वस्त्र व निवारा या किमान गरजांची पूर्तता होवू शकत नाही.आर्थिक विकासाच्या प्रक्रियेद्वारे दारिद्रय निर्मूलन करण्याचे प्रयत्न अनेक विकसनशील देशात सुरु आहेत.

"भारतातील भयानक दारिद्रयामुळे... भारत दोन होते एक श्रीमंताचा भारत आणि दुसरा असंख्य गरीबांचा भारत श्रीमंताचा भारत हा येथील मूठभर ब्रिटीश व परकीय नागरीकांचा होता तर गरीबांचा भारत हा असंख्य भारतीय नागरीकांचा होता."[1] दादाभाई नौरोजी यांनी आर्थिक शोषनाचा सिध्दांत मांडला दारिद्रयावर लिखाण करणाने ते पहिले भारतीय होते भारतातील संपत्ती इंग्लंडकडे कशी गेली ऐवढेच दाखवुन देणे त्यांचा मर्यादीत उद्देश नव्हता तर ब्रिटिशांनी भारतातून प्रचंड संपत्ती वाहून नेण्याचे भारत तसा दारिद्री झाला हे दाखवून देणे हा प्रमुख उद्देश होता व्यक्तीला किमान निर्वाह पातळीचे जीवन जगण्यासाठी आवश्यक उत्पन्न त्या व्यक्तिस मिळाले पाहीजे.आर्थिक विकासाच्या समस्येवर विचारमंथन करताना दारिद्रयचे दृष्टचक्र ला संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे अर्थशास्त्रज्ञ रॅग्नर नकर्स च्या मते, "दारिद्रयाच्या दृष्टचक्राचा संबंध चक्रीय संबंध असणाऱ्या अशा आर्थिक घटकांशी येतो की जे घटक गरीब देशाला दारिद्रयातच ठेवतात "[2]दारिद्रयामध्ये दिवसेंदिवस वाढ होऊन गरीब देश आणखी दारिद्रयी बनतो म्हणुन प्रा.नर्क्स म्हणतात देश गरीब आहे कारण तो गरीब आहे (A country is poor because it is poor)

**दारिद्रयाची संकल्पना :-**

विकसनशील देशात अनेक सामाजीक व आर्थिक समस्या आहेत त्यापैकी दारिद्रय ही एक समस्या आहे दारिद्रय म्हणजे काय ? दारिद्रय रेषा ? दारिद्रयाचे मोजमाज व अंदाज कसे ठरवावे या प्रश्नांचा ऊहापोह अर्थतज्ञांनी व काही समित्यांनी केला आहे सर्वसामान्यपणे दारिद्रय म्हणजे आर्थिक गरीबी असा अर्थ परिचयाचा आहे या संकल्पनेचा अर्थ काळानुसार व व्यक्तीनुसार वेगवेगळा लावला जाण्याची शक्यता असते .

१.व्यक्तीला मुलभुत गरजा भागविण्याच्या आर्थिक क्षमतेचा अभाव म्हणजे दारिद्रय होय.

२."दररोज किमान २२५० कॅलरिज / उष्मांक मिळविण्यासाठी लागणारे अन्न खरेदी करण्याची व्यक्तिची असमर्थता म्हणजे दारिद्रय होय."[3]

दारिद्रयाच्या संबध व्यक्तीच्या किंवा कुंटुबाच्या मुलभुत गरजांशी आहे.

दारिद्रय ही संकल्पला निरपेक्ष व सापेक्ष अशा दोन दृष्टिकोनातुन विचारात घेतली जाते.

**निरपेक्ष दारिद्रय :- (Absolute poverty)**

निरपेक्ष दारिद्रय संकल्पनेत जीवन जगण्यासाठी कमीत कमी वस्तू ठरविण्यात येतात अशा वस्तुचे किमंतीमध्ये रुपांतर केले जाते ज्यांचे उत्पन्न अशा किमान रक्कमेपेक्षा कमी असते त्यांचा समावेश निरपेक्ष दारिद्रयात केला जातो ६ व्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी नियोजन आयोगामुळे निरपेक्ष दारिद्रयाची व्याख्या केली ज्या व्यक्तिंना ग्रामीण भागात दररोज दरडोई २४०० उष्मांक व शहरी भागात २१०० उष्मांक देणारा आहार खरेदी करण्याऐवढे उत्पन्न मिळत नाही त्या व्यक्ती दारिद्रय रेषेखाली आहेत असे समजावे .

**सापेक्ष दारिद्रय ( Relative Poverty )**

या संकल्पनेत लोकसंख्येची उत्पन्नानुसार गटवारी केलेली असते .उत्पन्नाच्या गटवारीत वरचा गट अधिक संपन्न अवस्थेत आणि शेवटचा गट तूलनात्मक दृष्टया खुपच गरीब असतो म्हणजे जे कमी उत्पन्न गटात असतात ते उच्च गटातील लोकांचा तुलनेत दारिद्रयी असतात.

भारतीय दारिद्रयाचा विचार करीत असताना निरपेक्ष दारिद्रयाचा विचार केला जातो

**दारिद्रय रेषा ( Poverty Line)**

भारतील अर्थतज्ञांनी व काही संस्थानी दारिद्रयाचे अंदाज व्यक्त केले आहेत एकाच घरात राहणाऱ्या लोकांच्या वार्षिक उत्पन्नाची विशिष्ट उत्पन्न पातळीची तुलना केली जाते विशिष्ट उत्पन्न पातळी खालील कुंटुबे गरीबी रेषेखालील लोक संबोधले जातात नागरी व ग्रामीण भागासाठी विभिन्न दारिद्रय रेषा ठरविली जाते.

१९७३-७४ पासुन नियोजन आयोग दारिद्रयरेषा ठरविण्यासाठी पुढील दोन निकषांचा वापर करीत आहे.

१.दरडोई प्रतिदोन उष्मांक उपभोग PerCapita per day calories intake

२.दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च PerCapita per month consumption expenditure

दारिद्रयाचे निकष [४]

| निकष | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| दरडोई प्रतिदोन उष्मांक उपभोग | २४०० | २१०० |
| दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च | ३५६.३० | ५३८.६० |

दरडोई प्रतिमाह उपभोग खर्चाच्या निकषानुसार (२००४-०५)मध्ये दारिद्रय रेषा (आधारभूत वर्ष १९७३-७४) ग्रामीण भागात दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च ३५६.३० व नागरी भागात ५३८.६० एवढा निश्चित केला. जी कुंटुबे दारिद्रय रेषेपेक्षा कमी खर्च करतात त्यांना BPL तर ,जी कुंटुबे दारिद्रय रेषेपेक्षा जास्त खर्च करतात त्यांना APL संबोधले जाते .

दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या (२००९-१०) [५]

| देश / राज्य | ग्रामीण दारिद्रय प्रमाण | शहरी दारिद्रय प्रमाण | एकुण दारिद्रय प्रमाण |
|---|---|---|---|
| भारत | ३३.८ % | २०.०९ % | २८.८ % |

| | | | |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | २९.५ % | १८.३ % | २४.५ % |

**दारिद्रय कमी करण्यासाठी शासनाच्या उपाययोजना :-**

लोकांचे राहणीमान उंचावणे हे भारतीय नियोजनाचे उदिष्ट होते. पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातुन दारिद्रय कमी करण्यासाठी उपाय ही केलेले आहेत.

४थ्या पंचवार्षिक योजनेते 'गरीबी हटाव 'ची घोषणा १९७१ मध्ये करण्यात आली दारिद्रय निर्मुलनासाठी शासनाने विविध योजना व कार्यक्रम आमलात आणलेले आहेत त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे

| अ.क्र | योजना / कार्यक्रम | योजना उदेश | सुरुवात |
|---|---|---|---|
| १. | अंत्योदय योजना | अत्यंतगरीब कुंटुबांना आर्थिकदृष्टया सक्षम बनविणे | १९७७-७८ |
| २. | एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम | स्वंयरोजगारासाठी उत्पादन क्षम मालमतेचा पुरवठा करुन ग्रामीण गरीबांचा सर्वांगिण विकास | २ ऑक्टोंबर १९८० |
| ३ | ग्रामीण भागातील स्त्रिया व मुलांचा विकास | दारिद्रय रेषेखालील कुंटुबामधील स्त्रियांना स्वयंरोजगाराच्या संधी | सप्टेंबर १९८२ |
| ४. | राष्ट्रीय सामाजीक सहाय्य कार्यक्रम | दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी सामाजीक सुरक्षा | १५ ऑगस्ट १९९५ |
| ५. | अंत्योदय अन्न योजना | BPL कुंटुबांना २५ कि.ग्रॅ. अन्न धान्य देणे | २५ डिसेंबर २००० |

या योजना व्यतिरीक्त अनेक विविध योजना शासनाने हती घेतल्या आहेत .परंतु दारिद्रयाचे प्रमाण मोजण्याबाबत अनेक मतभेद आहेत दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमात मोठी रक्कम खर्च केली जाते परंतु महत्वाची अडचण म्हणजे संपुर्ण रक्कम लाभार्थी पर्यंत पोहचत नाही सध्या दारिद्रय निर्मुलन करताना पुढील काही मुदयावंर लक्ष देणे गरजेचे आहे.

☞मानव संसाधन विकासात गुंतवणुक वाढविणे.

☞पायाभुत क्षेत्रामधील गुंतवणुक वाढविणे.

☞सामाजीक न्याय व मानवी हक्कावर भर देणे

☞भ्रष्टाचारास प्रतिबंध घालणे

☞राजकीय इच्छाशक्ती व योग्य दृष्टीकोन बाळगणे